मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 19 मे 2026 | पान- 1

# जूनपर्यंत मालमत्ता करावर विविध सवलती

## 1 लाख 65 हजारांहून अधिक नागरिकांनी घेतला लाभ, मालमत्ता कर भरण्यावर विविध सवलती जाहीर करण्यात आल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने शहरातील मालमत्ताधारकांसाठी मालमत्ता कर भरण्यावर विविध सवलती जाहीर करण्यात आल्या असून, नागरिकांनी या सवलतींचा लाभ घेत वेळेत मालमत्ता कराचा भरणा करावा, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे. ३० जून २०२६ पर्यंत संपूर्ण कराचा ऑनलाईन भरणा करणाऱ्या नागरिकांना १० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जात असून, कुटुंबातील महिलेच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेला ३० टक्क्यांपर्यंत विशेष सवलतीचा लाभ देण्यात येत आहे.



महापालिकेच्या कर संकलन मोहिमेला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत तब्बल १ लाख ८२ हजार ३३५ मालमत्ताधारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेतला आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने कर भरून १० टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. महापालिकेने नागरिकांना घरबसल्या सुलभ पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे ऑनलाइन भरण्याकडे कल वाढत असल्याचे दिसून येत आहे.

महापालिकेकडून चालू आर्थिक वर्षातील कर संकलनासोबतच थकीत कर वसुलीवरही विशेष भर देण्यात येत आहे. शहरातील मालमत्ताधारकांना कर भरण्याबाबत वेळेत माहिती मिळावी, यासाठी आतापर्यंत ६ लाख ६५ हजार ४७० मालमत्तांचे कर बिल वाटप करण्यात आले आहे. याशिवाय थकीत कर न भरलेल्या मालमत्ताधारकांविरोधात कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, आतापर्यंत ३४ हजार १०८ थकबाकीदारांना जप्तीपूर्वीच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

> पिंपरी चिंचवड शहराच्या विकासात नागरिकांनी भरलेला मालमत्ता कर हा अत्यंत महत्त्वाचा वाटा उचलतो. याच निधीतून शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य आणि इतर नागरी सुविधा अधिक सक्षम करण्याचे काम केले जाते. त्यामुळे नागरिकांनी महापालिकेने दिलेल्या सवलतींचा लाभ घेत वेळेत मालमत्ता कर भरावा आणि शहर विकासात आपला सहभाग नोंदवावा."
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त,
> पिंपरी चिंचवड महानगरपालिका


> महापालिकेच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी ३० जूनपूर्वी मालमत्ता कराचा भरणा करावा. ऑनलाईन पद्धतीने कर भरल्यास १० टक्क्यांपर्यंत सवलतीचा लाभ मिळत आहे. तसेच महिलांच्या नावावरील निवासी मालमत्तांसाठी विशेष सवलत उपलब्ध आहे. थकीत कर असलेल्या मालमत्ताधारकांनी दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी तातडीने कर भरावा. नागरिकांनी वेळेत कर भरल्यास शहर विकासाच्या विविध प्रकल्पांना गती मिळण्यास मदत होईल.
>
> - सचिन पवार, उपायुक्त,
> पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पिंपरी-चिंचवड भाजपाचे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान 2026' उत्साहात संपन्न

## 'शतप्रतिशत भाजपा'चा विचार घराघरांत पोहोचवा – प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभरात राबविण्यात येत असलेल्या 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६' अंतर्गत पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याचा दोन दिवसीय भव्य निवासी प्रशिक्षण वर्ग लोणावळा येथे उत्साहात पार पडला. या प्रशिक्षण वर्गात पक्षाची विचारधारा, संघटनात्मक शिस्त, समाजाप्रती बांधिलकी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या महाअभियानात महाराष्ट्रातील अनेक प्रमुख नेत्यांनी सहभाग घेत विविध १२ विषयांवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील १५० हून अधिक पदाधिकाऱ्यांनी प्रशिक्षण वर्गात सहभाग नोंदविला.




प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते भारतमाता, डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी आणि पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी पक्षाच्या स्थापनेपासूनची माहिती देणारी भव्य प्रदर्शनीही उभारण्यात आली होती.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी "शतप्रतिशत भाजपा" हा विचार प्रत्येक घराघरात पोहोचवण्याचे आवाहन केले. देशात हजारो राजकीय पक्ष असले तरी केवळ भाजपामध्येच सातत्याने शाश्वत कार्य सुरू राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाचा सुवर्णकाळ सुरू असल्याचे सांगत कार्यकर्त्यांनी सामान्य नागरिकांना 'हवेहवेसे' वाटतील असे काम करावे, असा सल्लाही त्यांनी दिला. सार्वजनिक जीवनात वावरताना पक्षाची प्रतिमा उंचावेल असे वर्तन ठेवणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी पक्षशिस्त, प्रामाणिकपणा आणि प्रत्येक कार्यकर्त्याचा सन्मान यावर भर दिला. "पिंपरी-चिंचवडच्या प्रत्येक गल्लीमध्ये भाजपा दिसला पाहिजे," असेही त्यांनी स्पष्ट केले.

**(उर्वरित पान २ वर)**

# आमदार महेश लांडगे यांना यंदाचा 'स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार' जाहीर!

## दि. 24 मे रोजी निगडीतील ग.दि.मा. नाट्यगृहात वितरण; ज्येष्ठ विचारवंत अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते सन्मान

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्ताने दिला जाणारा यंदाचा प्रतिष्ठित 'स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार' भोसरी विधानसभेचे आमदार आणि प्रखर हिंदुत्ववादी नेते महेश लांडगे यांना जाहीर करण्यात आला आहे.

ब्राह्मण जागृती सेवा संघातर्फे या गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, रविवार दिनांक २४ मे रोजी सायंकाळी ५ वाजता निगडी येथील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात हा भव्य कार्यक्रम पार पडणार आहे, अशी माहिती संयोजक राजन लोणकर यांनी पत्रकाद्वारे दिली.



ब्राह्मण जागृती सेवा संघातर्फे दरवर्षी पिंपरी-चिंचवड शहरात सावरकर जयंतीनिमित्त जाहीर कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या वर्षीच्या कार्यक्रमात 'सावरकर समजून घेताना' या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर माजी सनदी अधिकारी तथा 'चाणक्य मंडळ परिवाराचे' प्रमुख, ज्येष्ठ विचारवंत अविनाश धर्माधिकारी यांचे मुख्य मार्गदर्शन लाभणार आहे.

निगडी येथील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात होणारा हा सोहळा विचार आणि कर्तृत्वाचा सुवर्णसंगम ठरणार आहे. या सोहळ्याला आणि व्याख्यानाला पिंपरी-चिंचवड शहर व परिसरातील तमाम राष्ट्रभक्तांनी आणि नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ब्राह्मण जागृती सेवा संघ आणि संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### देव, देश आणि धर्म 'साठीच्या कार्याची दखल

**» पुरस्काराची घोषणा करताना संयोजकांनी सांगितले की, आमदार महेश लांडगे हे पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण महाराष्ट्रात एक आक्रमक हिंदुत्ववादी वक्ते म्हणून परिचित आहेत. त्यांचे धर्मजागरण, गोरक्षा आणि सामाजिक ऐक्याच्या विविध विषयांवरील दौरे आता संपूर्ण राज्यभर सुरू आहेत. विविध हिंदू संमेलनांच्या माध्यमातून ते सातत्याने समाजाला दिशा देण्याचे काम करत आहेत. त्यांच्या याच 'देव, देश आणि धर्म' या त्रिसूत्रीवरील अखंड कार्याची आणि योगदानाची दखल घेऊन यंदाचा 'स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार' त्यांना प्रदान करण्यात येत आहे.**

# मोशीत वैद्यकीय क्षेत्रातील मोठी क्रांती!

## धनश्री हॉस्पिटलमध्ये ओपन हार्ट सर्जरीशिवाय अत्याधुनिक 'TAVI' हृदय शस्त्रक्रिया यशस्वी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड आणि मोशी परिसरातील वैद्यकीय क्षेत्रात एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. येथील नामांकित 'धनश्री हॉस्पिटल' मध्ये हृदयविकार उपचार क्षेत्रातील मैलाचा दगड ठरलेली, अत्यंत गुंतागुंतीची आणि अत्याधुनिक अशी 'TAVI' (TRANSCATHETER AORTIC VALVE IMPLANTATION) हृदय प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली. पारंपरिक ओपन हार्ट सर्जरीला एक सुरक्षित आणि प्रभावी पर्याय म्हणून ओळखली जाणारी ही प्रगत वैद्यकीय पद्धत आता स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्याने गंभीर हृदयरुग्णांना खूप मोठा दिलासा मिळाला आहे. विशेषतः वाढते वय किंवा इतर आजारांमुळे ज्या रुग्णांना पारंपरिक ओपन हार्ट शस्त्रक्रिया करणे अत्यंत जोखमीचे असते, अशा रुग्णांसाठी ही 'TAVI' पद्धत वरदान ठरते. धनश्री हॉस्पिटलमधील अत्याधुनिक कॅथ लॅब (CATH LAB) आणि तेथील प्रगत तंत्रज्ञानाच्या जोरावर ही गुंतागुंतीची प्रक्रिया अत्यंत सुलभतेने पार पाडण्यात आली. हॉस्पिटलचे अनुभवी कार्डिओलॉजिस्ट डॉ. अरविंद सिंग, भूलतज्ज्ञ डॉ. अश्विन भालेराव आणि त्यांच्या संपूर्ण हृदयविकार तज्ज्ञांच्या टीमने अत्यंत कौशल्याने आणि अचूकतेने ही शस्त्रक्रिया यशस्वी करून दाखवली.




या ऐतिहासिक यशामुळे आता मोशी, भोसरी आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील रुग्णांना अशा महागड्या आणि क्लिष्ट उपचारांसाठी मुंबई किंवा पुणे सारख्या मोठ्या महानगरांमध्ये धाव घेण्याची गरज उरलेली नाही.

रुग्णालयाच्या मेडिकल डायरेक्टर डॉ. सलोनी पटवर्धन यांनी या यशाबद्दल बोलताना सांगितले की, धनश्री हॉस्पिटल हे रुग्णांना नेहमीच आंतरराष्ट्रीय दर्जाची, दर्जेदार, सुरक्षित आणि अत्याधुनिक आरोग्यसेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे आणि 'TAVI' सारख्या प्रगत उपचारांची सुरुवात हे याच ध्येयाचे पुढचे पाऊल आहे. अत्याधुनिक कॅथ लॅब, अद्ययावत आयसीयू (ICU), २४ तास आपत्कालीन सेवा आणि निष्णात डॉक्टरांच्या टीममुळे धनश्री हॉस्पिटल हे परिसरातील सर्वसमावेशक आरोग्यसेवेचे मुख्य केंद्र बनले आहे.

# पिंपरी-चिंचवड भाजपाचे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभिन 2026' उत्साहात संपन्न

( पान १ वरून )
उद्घाटनप्रसंगी आमदार चित्रा वाघ, रवींद्र अनासपुरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, आमदार अश्विनी जगताप, माजी खासदार अमर साबळे, संघटन सरचिटणीस अॅड. मोरेश्वर शेडगे, सदाशिव खाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

प्रशिक्षण वर्गाच्या पहिल्या दिवशी व्यावहारिक कार्यपद्धती, वैचारिक अधिष्ठान, कार्य विस्तार, मीडिया व्यवस्थापन, कार्यपद्धती, देशासमोरील आव्हाने आणि कार्यकर्ता विकास या विषयांवर विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी योगा व व्यायाम सत्राने दिवसाची सुरुवात झाली. त्यानंतर बूथ व्यवस्थापन, भाजपा इतिहास, केंद्र सरकारच्या योजना, सोशल मीडिया, AI, नमो अॅप, सरल अॅप आणि विचार परिवार या विषयांवर सत्रांचे आयोजन करण्यात आले.

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली या प्रशिक्षण वर्गाचे संपूर्ण नियोजन आणि व्यवस्थापन पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानाचे जिल्हा प्रमुख व संगठन सरचिटणीस अॅड. मोरेश्वर शेडगे यांनी केले. त्यांना मधुकर बच्चे, संजय परळीकर, संजय पटणी, भूषण जोशी, अमेय देशपांडे आणि सचिन राऊत यांनी सहकार्य केले. या दोन दिवसीय प्रशिक्षण महाअभियानामुळे कार्यकर्त्यांना वैचारिक बळ मिळाले असून संघटना अधिक सक्षम, शिस्तबद्ध आणि गतिमान होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला.

# पुणे विभागाची स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक जाहीर

## निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संबंधित मतदारसंघात आचारसंहिता तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे.



**पुणे | प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील द्वैवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठीही निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संबंधित मतदारसंघात आचारसंहिता तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे.

जाहीर कार्यक्रमानुसार २५ मे २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध होणार असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १ जून २०२६ आहे. अर्जांची छाननी २ जून रोजी होईल, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

या निवडणुकीसाठी मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे. मतमोजणी २२ जून २०२६ रोजी होणार असून २५ जूनपूर्वी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने संबंधित प्रशासनाला आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या अधिकृत वेळापत्रकानुसार, या निवडणुकीची प्रक्रिया २५ मे २०२६ रोजी अधिकृत अधिसूचना जारी करून सुरु होईल. त्यानंतर इच्छुकांना उमेदवारी अर्ज भरण्यासाठी ०१ जून २०२६ पर्यंतचा वेळ देण्यात आला असून हीच नाव नोंदणीची शेवटची तारीख असेल. दाखल झालेल्या सर्व अर्जांची छाननी ०२ जून २०२६ रोजी केली जाईल, तर उमेदवारांना आपले अर्ज मागे घेण्यासाठी ०४ जून २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, या १६ जागांसाठी १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत प्रत्यक्ष मतदान पार पडणार आहे. मतदानानंतर २२ जून २०२६ रोजी मतमोजणी होऊन निवडणुकीचे निकाल स्पष्ट होतील आणि २५ जून २०२६ पर्यंत ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापणार असून भारतीय निवडणूक आयोगाने विधान परिषदेच्या १६ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. जाहीर वेळापत्रकानुसार, या १६ जागांसाठी येत्या १८ जून रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून, २२ जून रोजी मतमोजणी होऊन निकाल स्पष्ट होतील. ही निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही गटांसाठी अत्यंत प्रतिष्ठेची मानली जात आहे. या निवडणुकांच्या घोषणेमुळे संबंधित मतदारसंघांत आता राजकीय हालचालींना वेग आला असून उमेदवारी कोणाला मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कोणत्या मतदारसंघात होणार मतदान?

» पुणे मतदारसंघ या निवडणुकीसाठी मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे. मतमोजणी २२ जून २०२६ रोजी होणार असून २५ जूनपूर्वी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने संबंधित प्रशासनाला आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### मतदारसंघात होणार मतदान?

» सोलापूर मतदारसंघ : प्रशांत प्रभाकर परिचारक
» अहमदनगर मतदारसंघ : अरुणकाका बालभीमराव जगताप
» ठाणे : रविंद्र सदानंद फाटक
» जळगाव मतदारसंघ : चंदूभाई व्ही. पटेल
» सांगली-सह-सातारा मतदारसंघ : कदम मोहनराव श्रीपती
» नांदेड मतदारसंघ : अमरनाथ अनंतराव राजूरकर
» यवतमाळ मतदारसंघ : दुष्यंत सतीश चतुर्वेदी
» पुणे मतदारसंघ : अनिल शिवाजीराव भोसले
» भंडारा-सह-गोंदिया मतदारसंघ : डॉ. परिणय रमेश फुके
» रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघ : अनिकेत सुनील तटकरे
» नाशिक मतदारसंघ : नरेंद्र भिकाजी दराडे
» वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली मतदारसंघ : रामदास भगवानजी आंबटकर
» अमरावती मतदारसंघ : प्रवीण रामचंद्र पोटे
» उस्मानाबाद-लातूर-बीड मतदारसंघ : धस सुरेश रामचंद्र
» परभणी-सह-हिंगोली मतदारसंघ : विप्लव गोपीकिसन बाजोरिया
» औरंगाबाद-सह-जालना मतदारसंघ : अंबादास एकनाथराव दानवे

# इंधन दरवाढीच्या निषेधार्थ शरद पवारांच्या पक्षाकडून बैलगाडी व टांगा मोर्चा...

## दरवाढ मागे घेण्यात आली नाही, तर यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा



**पुणे | प्रतिनिधी**

पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पुणे शहर शाखेच्या वतीने सोमवारी पुणे महापालिकेवर बैलगाडी व टांगा मोर्चा काढण्यात आला. शहराध्यक्ष श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या आंदोलनात केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

इंधन दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांवरील आर्थिक ताण वाढला असून, वाहतूक खर्च वाढल्याने जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीदेखील वाढत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. केंद्रातील भारतीय जनता पक्ष सरकारच्या धोरणांमुळे महागाई वाढत असून, सामान्य नागरिक त्रस्त झाल्याची टीकाही यावेळी करण्यात आली.

तसेच ही दरवाढ तातडीने मागे घेण्यात आली नाही, तर यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

मोर्चामध्ये गटनेते काकासाहेब चव्हाण, महिला अध्यक्षा स्वातीताई पोकळे, गफुरभाई पठाण, अनिताताई इंगळे, रविंद्रअण्णा माळवदकर, दीपक जगताप, अजिंक्य पालकर, अमोघ ढमाले, हर्षद जाधव, प्रवीण तुपे, मकरंद देशमुख, वंदना मोडक, दिलशाद अत्तार, उर्मिला गुंड, जयश्री आदमाने, मेघा सातव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### इंधन दरवाढीविरोधात बैलगाडी मोर्चा

» पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पुणे शहर शाखेने पुणे महापालिकेवर बैलगाडी आणि टांगा मोर्चा काढत केंद्र सरकारचा निषेध नोंदविला. शहराध्यक्ष श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या आंदोलनात कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत इंधन दरवाढ तातडीने मागे घेण्याची मागणी केली. वाढत्या इंधन दरांमुळे वाहतूक खर्च वाढून जीवनावश्यक वस्तू महाग झाल्याने सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक ताण वाढत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. दरवाढ मागे न घेतल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. मोर्चात पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# पहिला पुरस्कार अजितदादांच्या नावाने... मुख्यमंत्री देवेंद्र फडणवासांनी केली मोठी घोषणा

## पुणे ॲग्री हॅकेथॉनच्या धर्तीवर राज्यस्तरावर महाराष्ट्र ॲग्री हॅकेथॉन घेण्यात येणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

कृषी क्षेत्रातील विविध संशोधन आणि नवकल्पनांना चालना देण्यासाठी पुढील वर्षापासून पुणे ॲग्री हॅकेथॉनच्या धर्तीवर राज्यस्तरावर महाराष्ट्र ॲग्री हॅकेथॉन घेण्यात येणार आहे. या स्पर्धेतील प्रथम पुरस्कार अजित पवार यांच्या नावाने देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

कृषी विभागाच्या वतीने कृषी महाविद्यालय येथे आयोजित दुसऱ्या 'पुणे ॲग्री हॅकेथॉनच्या समारोप आणि पारितोषिक वितरण समारंभात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, हेमंत रासने, राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेती अधिक शाश्वत, तंत्रज्ञानाधारित आणि उत्पादनक्षम करण्यासाठी आधुनिक संशोधन व नवकल्पनांची जोड आवश्यक असून कृषी नवसंकल्पना स्पर्धेसारखे उपक्रम भविष्यातील कृषी व्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरत आहेत. पुढील वर्षापासून 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा' राज्यव्यापी स्वरूपात आयोजित करण्यात येईल. तसेच स्पर्धेतील प्रथम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाईल.

पुणे ॲग्री हॅकेथॉनमधील निवडक १८ नवकल्पनांना पुढील टप्प्यात विशेष मदत आणि मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यापैकी किमान १२ प्रकल्प बाजारात यावेत म्हणून राज्य सरकारकडून प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाहीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.



### अजित पवार यांच्या नावाने प्रथम पुरस्कार

» राज्यस्तरीय महाराष्ट्र ॲग्री हॅकेथॉनमधील प्रथम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाणार आहे. कृषी क्षेत्रात तंत्रज्ञान आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या विचारांचा सन्मान म्हणून हा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनीही या स्पर्धेची संकल्पना अजित पवार यांच्या पुढाकारातून साकार झाल्याचे नमूद केले. या पुरस्कारामुळे तरुण संशोधकांना प्रेरणा मिळेल तसेच कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कल्पनांना अधिक प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### राज्यस्तरीय ॲग्री हॅकेथॉनची घोषणा

» पुणे ॲग्री हॅकेथॉनला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर राज्य सरकारने पुढील वर्षापासून "महाराष्ट्र ॲग्री हॅकेथॉन" आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा करत कृषी क्षेत्रात संशोधन आणि नवकल्पनांना चालना देण्यावर भर दिला. या उपक्रमामुळे तरुण संशोधक, स्टार्टअप्स आणि कृषी विद्यार्थ्यांना नवे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. तंत्रज्ञानाधारित शेती, आधुनिक उपकरणे, पाणी व्यवस्थापन आणि उत्पादनवाढीसाठी उपयुक्त संकल्पनांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. राज्यातील कृषी क्षेत्र अधिक आधुनिक आणि स्पर्धात्मक करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचे मानले जात आहे.

### १८ नवकल्पनांना विशेष मार्गदर्शन

» पुणे ॲग्री हॅकेथॉनमध्ये निवड झालेल्या १८ नवकल्पनांना राज्य सरकारकडून विशेष मदत आणि मार्गदर्शन दिले जाणार आहे. यातील किमान १२ प्रकल्प प्रत्यक्ष बाजारपेठेत आणण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान, स्मार्ट शेती, उत्पादनवाढ आणि शाश्वत शेतीसाठी उपयुक्त संशोधनांना या माध्यमातून चालना मिळणार आहे. राज्य सरकार, कृषी विद्यापीठे आणि तज्ज्ञ संस्थांच्या सहकार्याने या प्रकल्पांना आवश्यक तांत्रिक आणि आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

# 'नीट' पेपरफुटी प्रकरणात पुण्यातून अटक झालेली ब्युटिशियन मनीषा वाघमारे रॅकेटमधील मुख्य दुवा

## पुण्यातून ताब्यात घेतलेली एक ब्युटिशियन या संपूर्ण रॅकेटमधील मुख्य दुवा असल्याचे केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (CBI) तपासात उघड झाले

**पुणे | प्रतिनिधी**

वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'नीट' परीक्षा पेपरफुटी प्रकरणात आता एक मोठी माहिती समोर आली आहे. पुण्यातून ताब्यात घेतलेली एक ब्युटिशियन (सौंदर्यतज्ज्ञ) या संपूर्ण रॅकेटमधील मुख्य दुवा असल्याचे केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (CBI) तपासात उघड झाले आहे. विद्यार्थ्यांना शिकवणीसाठी शिक्षक शोधून देणे, शाळांमधील मोठ्या शिक्षकांशी संपर्क साधणे आणि या बदल्यात लाखो रुपयांचे कमिशन घेणे, अशा कामांमधून या महिलेने पेपर लीकचे मोठे जाळे विणल्याचे समोर आले आहे.

मनीषा वाघमारे हिला कुठूनतरी सुगावा लागला की मनीषा मांधरे ही नीटचे पेपर सेट करणाऱ्या कमिटीमध्ये आहे. वाघमारेने तातडीने मांधरेची भेट घेऊन पेपर लीक करण्याचा कट रचला. या कटामध्ये त्यांनी निवृत्त शिक्षक प्रल्हाद विठ्ठलराव कुलकर्णी यांनाही सामील करून घेतले. ब्युटी पार्लरच्या व्यवसायामुळे वाघमारेचा अनेक पालकांशी आणि विद्यार्थ्यांशी संपर्क येत असे. शिकवणी लावून देण्याच्या बहाण्याने तिने गरजू आणि श्रीमंत विद्यार्थ्यांचा शोध सुरू केला. एका विद्यार्थ्याकडून पेपर देण्यासाठी तब्बल १० लाख रुपयांचा सौदा ठरवला गेला होता. या १० लाख रुपयांमधून वाघमारे, मांधरे आणि कुलकर्णी हे आपापसात अडीच ते तीन लाख रुपये वाटून घेणार होते.

मनीषा वाघमारेने तिचे जुने मित्र धनंजय लोखंडे यांच्या माध्यमातून नाशिकमध्ये समुपदेशनाचा (व्यवसाय करणाऱ्या शुभम खैरनार याच्याशी संपर्क साधला. वाघमारेकडून मिळालेला पेपर लोखंडेने खैरनारला दिला. खैरनारने तो पेपर 'पीडीएफ' (PDF) स्वरूपात गुरुग्रामच्या यश यादवला आणि पुढे जयपूरमधील हस्तकांना पाठवला. गेल्या मंगळवारी परीक्षा रद्द झाल्यानंतर काही तासांतच शुभम खैरनारला अटक करण्यात आली होती.



### NTA'च्या पॅनेलवरूनच पेपर लीक?

» सीबीआयने न्यायालयात दिलेल्या माहितीनुसार, मनीषा मांधरे ही 'एनटीए' च्या (NTA) अधिकृत प्रश्नपत्रिका समितीमध्ये तज्ज्ञ म्हणून कार्यरत होती. त्यामुळे तिच्याकडे 'नीट' परीक्षेच्या वनस्पतिशास्त्र (Botany) आणि प्राणिशास्त्र (Zoology) या दोन्ही विषयांच्या अंतिम प्रश्नपत्रिकांची संपूर्ण माहिती आणि प्रवेश होता. या पदाचा गैरवापर करून मांधरे हिने अफाट पैशांच्या मोहापायी ही गुप्त माहिती आणि प्रश्नपत्रिका काही निवडक विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वीच पुरवल्याचा आरोप सीबीआयने केला आहे.